# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः07.07.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

१.संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन 22 जुलैपासून, 23 जुलैला लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर होणार,

२.देशाच्या वाहन उद्योगाची उलाढाल 50 लाख कोटी रुपयांवर नेण्यासाठी सरकार प्रयत्नशील - केंद्रीय मंत्री नीतीन गडकरी यांची माहिती

३. महाराष्ट्राला यावर्षीचा सर्वोत्तम कृषी राज्य पुरस्कार जाहीर,

४. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून रशिया आणि ऑस्ट्रियाच्या तीन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर

५.फ्रान्समध्ये मध्यावधी सार्वत्रिक निवडणुकांची आज दुसरी फेरी,

६.आसाममधील पुरात गेल्या 24 तासांत आणखी 6 जणांचा मृत्यू, पुरातील मृतांची संख्या 58 वर.

**अधिवेशन**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन 22 जुलैपासून सुरू होणार असल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रीजिजू यांनी समाज माध्यमावरील पोस्टद्वारे दिली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन 23 जुलैला लोकसभेत 2024-25 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करतील.12 ऑगस्टपर्यंत हे अधिवेशन सुरू राहणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प असेल. हा अर्थसंकल्प सरकारची दूरगामी धोरणं आणि भविष्यवेधी दृष्टिकोनाचा प्रभावी दस्तऐवज असेल असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गेल्या महिन्यांत संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीतल्या अभिभाषणात म्हटलं होतं. लोकसभा निवडणुकांमुळे यावर्षी फेब्रुवारीमध्ये अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता.

**राष्ट्रपती-ओडिशा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं काल संध्याकाळी चार दिवसांच्या ओडिशा दौऱ्यासाठी भुवनेश्वर इथं आगमन झालं. ओडिशाचे राज्यपाल रघुवर दास, मुख्यमंत्री मोहनचरण माझी आणि अन्य मान्यवरांनी त्यांचं बिजू पटनाईक आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्वागत केलं.

**ओडिशा-रथयात्रा**

ओडिशात,भगवान जगन्नाथ,भगवान बलभद्र,देवी सुभद्रा आणि भगवान सुदर्शन यांची जगप्रसिद्ध रथयात्रा आज पुरी या शहरात होत आहे.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या वार्षिक उत्सवात सामील होतील. जगातील विविध भागातून लाखो भाविक इथं आले आहेत. राज्य सरकारने रथयात्रेसाठी आज आणि उद्या अशी दोन दिवसांची सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. जगन्नाथाची रथयात्रा एक दिवसाची असते, परंतु विशिष्ट खगोलीय व्यवस्थेमुळे, ती या वर्षी दोन दिवस चालणार आहे, यापूर्वी 1971 मध्ये अशी स्थिती आली होती.

श्रीजगन्नाथ मंदिराच्या सिंह दरवाजासमोर स्थित आणि श्री गुंदिचा मंदिरात नेण्यासाठी रथ तयार असून तिथं ते आठवडाभर राहतील. सर्व विधी आटोपल्यानंतर आज दुपारी भाविक रथ ओढणार आहेत. प्रथेला फाटा देत यावेळी भगवान जगन्नाथ, देवी सुभद्रा आणि भगवान बलभद्र या तिन्ही भावंड देवतांचा समावेश असलेले अनेक विधी एकाच दिवशी केले जातील.

**गडकरी**

देशाच्या वाहन उद्योगाच्या वाढीसाठी अनेक प्रयत्न करण्यात येत असून येत्या काही वर्षात या उद्योगाची उलाढाल 50 लाख कोटी रुपयांवर नेण्याचं उद्दीष्ट असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नीतीन गडकरी यांनी काल सांगितलं. नागपुरातील बुटीबोरी एमआयडीसीत होरिबा कंपनीच्या एका प्रकल्पाचं उद्घाटन करताना गडकरी बोलत होते. विदर्भाचा आर्थिक आणि सामाजिक विकासात मागे आहे. त्यामुळं या भागातली गरिबी दूर करण्यासाठी रोजगारनिर्मिती करणं हा सर्वात कळीचा मुद्दा आहे. या भागात सेमीकंडक्टर प्रकल्प उभा राहिल्यानं त्याची निश्चितपणे रोजगार निर्मितीला मदत होईल असा विश्वास गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

**कृषी राज्य पुरस्कार**

महाराष्ट्राला यावर्षीचा सर्वोत्तम कृषी राज्य पुरस्कार जाहीर झाला आहे. पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षितता यांच्या माध्यमातून राज्य सरकारनं राबविलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेत कृषी नेतृत्व पुरस्कार समितीनं या पुरस्काराची घोषणा केली अशी माहिती राज्याच्या कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली आहे. पीएम किसान सन्मान निधी दुप्पट करणं, लाखो शेतकऱ्यांना नॅनो खतांचं वितरण, तृणधान्य अभियानात श्री अन्न म्हणून सावा, राळा-भुरका यांसह विविध तृणधान्यांना प्राधान्य, त्यासाठी शंभर कोटी रुपयांची तरतूद, आणि तृणधान्यांना किमान आधारभूत

किंमत देणारा महाराष्ट्र देशात अव्वल आहे. बांबू लागवड, आणि औष्णिक वीज निर्मितीत बायोमासचा वापर अशी क्रांतिकारी पावलं राज्यानं उचलली आहेत. बांबू लागवडीसाठी हेक्टरी 7 लाख रुपायांचे अनुदान देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. नवी दिल्ली येथे 10 जुलै रोजी होणाऱ्या सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हा पुरस्कार स्वीकारणार आहेत.

**पंतप्रधान - रशिया ऑस्ट्रिया भेट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून रशिया आणि ऑस्ट्रियाच्या तीन दिवसीय अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मोदी 22 व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियन फेडरेशनचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या निमंत्रणावरून मॉस्कोमध्ये उपस्थित असतील. दोन्ही देशांमधील संपूर्ण बहुआयामी संबंधांचा आढावा दोन्ही नेते घेतील आणि परस्पर हिताच्या समकालीन प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण करतील.रशियाचा दौरा आटोपल्यानंतर पंतप्रधान मंगळवारी ऑस्ट्रियाला पोहोचतील. ऑस्ट्रियाचे चान्सलर कार्ल नेहॅमर यांनी मोदी यांची व्हिएन्ना भेट "विशेष सन्मान" असल्याचं सांगून आपण या भेटीची आतुरतेनं वाट पाहत असल्याचं म्हटलं आहे. गेल्या 41 वर्षांत भारतीय पंतप्रधानांची ही पहिलीच ऑस्ट्रिया भेट असेल. व्हिएन्ना इथं मुक्कामादरम्यान, पंतप्रधान मोदी ऑस्ट्रियाचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर व्हॅन डेर बेलेन यांची भेट घेतील आणि चांसलर नेहॅमर यांच्याशी चर्चा करतील. दोन्ही नेते भारत आणि ऑस्ट्रियातील आघाडीच्या व्यवसायिकांनाही संबोधित करतील.

**फ्रान्स - निवडणूक**

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी वर्तमान संसद विसर्जित केल्यानंतर आणि कालावधीच्या तीन वर्षे आधी मध्यावधी निवडणुकांची घोषणा केल्यानंतर फ्रान्समध्ये आज निवडणुकीची दुसरी फेरी होत आहे. प्राथमिक निकालांवरून दिसून आले की मरीन ल पेनच्या अतिउजव्या नॅशनल रॅलीने पहिल्या निवडणुकीत 30 टक्क्यांहून अधिक मतं मिळविली. मतदानाचा अंदाज सूचित करतो की नॅशनल रॅली पुढील नॅशनल असेंब्लीमध्ये सर्वाधिक जागा जिंकू शकते. त्यांनी पूर्ण बहुमतासाठी 289 जागा मिळवल्या तर मॅक्राँ,  फ्रान्सचे नवीन पंतप्रधान म्हणून जॉर्डन बार्डेला यांची नियुक्ती करू शकतात.9 जून रोजी, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी नॅशनल असेंब्ली विसर्जित करण्याची घोषणा केली आणि युरोपियन निवडणुकांमध्ये अतिउजव्या पक्षाच्या जबरदस्त विजयानंतर नवीन संसदीय निवडणुका घेण्याचं जाहीर केलं. फ्रान्सच्या कनिष्ठ सभागृह म्हणजे, नॅशनल असेंब्लीच्या निवडणुका दोन फेऱ्यांमध्ये होत असून, 577 जागांसाठी उमेदवार रिंगणात आहेत.

**काश्मीर**

जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात काल झालेल्या दोन वेगवेगळ्या चकमकीत चार दहशतवादी ठार झाले. या चकमकींमध्ये सुरक्षा दलाच्या दोन जवानांनाही वीरमरण आलं. दक्षिण काश्मीर जिल्ह्यातील फ्रिसल चिन्निगाम आणि मोडरगाम भागात या चकमकी झाल्या. चकमकीत ठार झालेल्या चार दहशतवाद्यांमध्ये एका दहशतवादी कमांडरचाही समावेश आहे.

**हाथरस - कोठडी**

सत्संगानंतर 121 जणांचा बळी घेणाऱ्या हाथरस चेंगराचेंगरी प्रकरणातील मुख्य आरोपीसह आणखी तीन जणांना पोलिसांनी अटक केली आहे. दिल्लीतून अटक करण्यात आलेल्या मुख्य आरोपी देवप्रकाश मधुकर याची हातरस पोलिसांनी काल वैद्यकीय तपासणी केली आणि त्यानंतर त्याला न्यायालयात हजर केलं. मुख्य आरोपीला दंडाधिकाऱ्यांनी 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी 6 आरोपींना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे. हाथरसच्या पोलिस अधीक्षकांनी सांगितलं की, आरोपी देव प्रकाश मधुकर हा 2010 पासून मनरेगामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून काम करत होता. देव प्रकाश यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणारे सेवेदार आणि आयोजन समितीचे कार्यकर्ते, भाविकांसाठी सुविधा करण्यास जबाबदार होते असं उघड झालं आहे. ते सत्संगाच्या वेळी पोलीस प्रशासनाला कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू देत नव्हते. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. एवढ्या मोठ्या कार्यक्रमासाठी पैसा कुठून आला त्याबाबतही चौकशी सुरू आहे.

**वैद्यकीय-परीक्षा**

राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान परीक्षा मंडळानं काल फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट परीक्षेचं आयोजन केलं. 50 शहरांमध्ये पसरलेल्या 71 केंद्रांवर 35 हजार 819 उमेदवारांसाठी ही परीक्षा घेण्यात आली. परीक्षेच्या सुरक्षेसाठी कडक उपाय म्हणून, NBEMS ने परीक्षेच्या संचालनावर देखरेख करण्यासाठी 250 पेक्षा जास्त निरीक्षकांची नियुक्ती केली. 45 प्राध्यापक सदस्य असलेल्या भरारी पथकही तैनात करण्यात आलं होतं. केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांच्या निर्देशानुसार, आरोग्य सेवा आणि इतर संस्थांच्या महासंचालकांनी सर्व परीक्षा केंद्रांवर वरिष्ठ व्यक्तीची नियुक्ती केली होती.

**विनेश गोल्ड**

अव्वल भारतीय कुस्तीपटू विनेश फोगटने काल माद्रिद इथं स्पेनच्या ग्रां प्रीमध्ये महिलांच्या 50 किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकलं. दोन वेळा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कास्यपदक विजेत्या विनेशनं अंतिम फेरीत रशियन कुस्तीपटू मारिया ट्युमेरेकोव्हा हिचा 10-5 असा पराभव करत सुवर्णपदक पटकावलं. विनेशने तीन लढती जिंकून अंतिम फेरीत धडक मारली.

**आसाम-पूर**

आसाममध्ये, गेल्या 24 तासांत पुरात आणखी 6 जणांचा मृत्यू झाल्यानं पुरातील मृतांची संख्या 58 वर पोहोचली आहे. राज्यातील पूरस्थिती कायम आहे आणि 29 जिल्ह्यांमधील सुमारे 24 लाख लोक अजूनही पुराच्या तडाख्यात अडकले आहेत. राज्यभरातील 107 महसुली मंडळातील 3500 हून अधिक गावे आणि 68 हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं आहे. NDRF आणि SDRF च्या पथकांनी गेल्या 24 तासात 218 लोकांची सुटका केली आहे. ब्रह्मपुत्र, बराक आणि त्यांच्या सर्व उपनद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. दरम्यान, भारतीय हवामान विभागानं पूरग्रस्त आसाममध्ये मुसळधार ते अतिवृष्टीचा इशारा दिला आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**